सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००३५१**

**अपिलार्थी श्री. विश्वनाथ कमलाकर कोळी**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
ट्रॉम्बे विभाग, प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (परिमंडळ-६)**
ट्रॉम्बे विभाग, आर.सी.एफ.पोलीस ठाणे, पहिला मजला
आर.सी.मार्ग, माहुल रोड, चेंबूर, मुंबई-४०० ०७४.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०४.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित
सहाय्यक जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १०.०६.२०२१ | २३.०६.२०२१ | ०७.०७.२०२१ | २१.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १४.०१.२०२२ रोजीच्या अर्जांन्वये माहिती देण्यास टाळाटाळ, विलंब केला आहे व दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २३.०६.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २१.१२.२०२१ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांचा माहिती अर्ज दि. १०.०६.२०२१ अन्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ट्रॉबे पोलीस ठाणे, ट्रॉम्बे, मुंबई यांनी दिनांक १४.०४.२०२१ रोजीच्या अतिश जगन्नाथ कोळी यांच्या तक्रार अर्जावर श्री. विश्वनाथ कमलाकर कोळी यांच्या केलेल्या पंचनामा व जबाब या संपूर्ण कारवाई संदर्भात दस्तऐवजाची झेरॉक्स प्रत मिळावी, अशी माहिती विचारलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. २३.०६.२०२१ अन्वये अपिलार्थी यांना मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस ठाणे अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती अर्जदार यांचे मागणी प्रमाणे सोबत जोडून सादर करीत आहे, असे कळविले आहे. व सोबत अपिलार्थी यांच्या दिनांक १४.०४.२०२१ रोजीच्या स्वत:च्या जबाबची प्रत जोडलेली आहे.

..२/-

अपिलार्थी यांनी दि. ०७.०७.२०२१ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.१२.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविलेली आहे. अपिलार्थी यांना त्यांच्या विरोधात दाखल तक्रार अर्जाची प्रत व चौकशी अहवालाची प्रत देण्यात यावी, असे आदेश पारीत करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रथम अपिलाच्या आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८.०१.२०२२ चे पत्रासोबत प्रथम अपिलाच्या आदेशानुसार अपिलार्थींना माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व सहाय्यक जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असे नमुद केले की, त्यांना अद्यापही संपूर्ण माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपिलार्थींना उपलब्ध माहिती दिलेली आहे. त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे काही माहिती दिलेली नव्हती. तथापि, आता ती अपिलार्थी यांना देता येईल.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, दिनांक २१.१२.२०२१ रोजी झालेल्या प्रथम अपील सुनावणीमध्ये अपिलार्थी यांना त्यांच्या विरोधात दाखल तक्रार अर्जाची प्रत व चौकशी अहवालाची प्रत देण्यात यावी, असे आदेश देण्यात आले होते. सुनावणीस अपिलार्थी उपस्थित असून त्यांचे म्हणणे आहे की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना त्वरीत माहिती पुरविण्यात येईल असे नमुद केले. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१. सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या विरोधात दाखल तक्रार अर्जाची प्रत व चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थींना सात दिवसांचे आत विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी.**

**२. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
२३-४-२०२४

**मुंबई**
**दिनांक : २३.०४.२०२४**

State Information Commission
Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**